# भारतातील नक्षलवादी चळवळीचा चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ.एस.के.खडसे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज
इस्लामपूर जिल्हा सांगली.

## प्रस्तावना

गेल्या हजारो वर्षापासून भारतामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे आणि जातिव्यवस्थेमुळे समाजव्यवस्थेत विविध प्रकारची सामाजिक सांस्कृतिक आर्थिक विषमता आढळून येते. या विविध प्रकारच्या अन्यायी व विषमतेविरुद्ध भारतामध्ये वेगवेगळे बंड किंवा विद्रोह झालेले आहेत. मग बुद्धाने आणि महावीराने अहिंसा व शांततेच्या मार्गाने केलेले केलेले हिंदू धर्मातील कर्मकांडाविरुद्ध विद्रोह असेल किंवा संत कबीर, सम्राट अशोक, संत तुकाराम यांनी हिंदू धर्मातील अंधश्रद्धा व अनिष्ट प्रथेविरुद्ध केलेला विद्रोह असेल, डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेविरुद्ध केलेला विद्रोह असेल आणि हिंदू धर्मातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरोधी स्त्रीसुधारकांची चळवळ असेल. अशाप्रकारे ज्या ज्या वर्गसमूहावर किंवा जातीवर विषमतेमुळे अन्याय, अत्याचार झाला असेल तर सरकार विरोधात किंवा व्यवस्था विरोधात विविध प्रकारच्या चळवळी उभ्या राहतात. हा भारताचा इतिहास आहे याचाच एक भाग म्हणून हे सामाजिक व आर्थिक विषमता विरोधात आपल्या न्याय व हक्कासाठी आदिवास्यांनी केलेले बंड म्हणजे नक्षलवाद होय.

नक्षलवादी चळवळ ही कायदा मोडणारी चळवळ आहे असे नसून ती भूमिहीन आदिवासींच्या न्याय हक्कासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांच्या विरोधात उभी केलेली चळवळ असून सामाजिक व आर्थिक विषमता विरोधी समतावादी व न्यायवादी चळवळ आहे. आदिवासींच्या जमिनी जमीनदारांनी, सावकाराने बळकावल्या. त्यामुळे जमीनदार व सावकारांच्या विरोधात ही चळवळ उभी राहिली आहे त्यासाठी सरकारने लोकशाही मार्गाने त्यांच्या मागण्यांचा विचार करून ज्या रास्त व न्याय्य मागण्या आहेत त्या त्रयस्थ सामाजिक कार्यकर्त्याकडून किंवा एनजीओकडून नक्षलवाद्यांशी चर्चा करून सोडवाव्यात. नक्षलवाद्यांच्या मागण्या मान्य करून सोडवल्या किंवा वर सुचवलेल्या उपाययोजना शासनाने जर केल्या तर नक्कीच अनेक वर्षापासूनची नक्षलवादाची समस्या सुटू शकेल यात कोणतीही शंका घेण्याचे कारण नाही

Key Words (की वर्ड) :-

1. नक्षलवाद : आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक अन्यायाविरुद्ध, न्यायहक्कासाठीची चळवळ.
2. जमीनदार : गावात सर्वात जास्त जमीन असणारा व इतरांना गुलामासारखे वागवणारा व शेतावर राबवून घेणारा मोठा शेतकरी.
3. विद्रोही चळवळ : सामाजिक व आर्थिक विषमतेविरुद्ध न्याय व हक्कासाठी चालवलेली व्यवस्थेविरोधातीलचळवळ.

4. राज्यव्यवस्था : संपूर्ण देशाची, राज्याची सर्व सार्वभौमसत्ता असणारी राजकीय संस्था किंवा सरकार.

5 प्रशासन यंत्रणा : राज्यसंस्थेच्या सरकारच्या आणि सत्ताधारी पक्षाच्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी करणारी शासकीय यंत्रणा.

6. भूमिहीन : गावातील किंवा आदिवासी पाड्यातील उपजीविकेसाठी कोणत्याही प्रकारची जमीन नसणारा.

7. माओवादी : माओ त्से तूंगच्या विचारावर प्रचंड श्रद्धा असणारा आणि माओ सांगितलेल्या जमीनदाराविरोधात शेतकऱ्याने सशस्त्र उठाव करूनच क्रांती घडवून आणण्यावर विश्वास असणारे.

**प्रस्तावना**

गेल्या हजारो वर्षापासून भारतामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे आणि जातिव्यवस्थेमुळे समाजव्यवस्थेत विविध प्रकारची सामाजिक सांस्कृतिक आर्थिक विषमता आढळून येते. या विविध प्रकारच्या अन्यायी व विषमतेविरुद्ध भारतामध्ये वेगवेगळे बंड किंवा विद्रोह झालेले आहेत. मग बुद्धाने आणि महावीराने अहिंसा व शांततेच्या मार्गाने केलेले केलेले हिंदू धर्मातील कर्मकांडाविरुद्ध विद्रोह असेल किंवा संत कबीर, सम्राट अशोक, संत तुकाराम यांनी हिंदू धर्मातील अंधश्रद्धा व अनिष्ट प्रथेविरुद्ध केलेला विद्रोह असेल, डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेविरुद्ध केलेला विद्रोह असेल, इंग्रजांविरुद्ध अन्याय अत्याचार विरुद्ध केलेले भारतीय लोकांनी बंड असेल किंवा शेतकऱ्यांच्या विरुद्ध ब्रिटिश सरकारने राबवलेल्या धोरणाविरुद्ध शेतकऱ्यांचे बंड असेल आणि हिंदू धर्मातील जाती व्यवस्थेविरोधात मानवी हक्क सामाजिक समता, सामाजिक न्याय व स्वातंत्र्यासाठी उभारलेली दलित चळवळ असेल हिंदू धर्मातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरोधी स्त्रीसुधारकांची चळवळ असेल. अशाप्रकारे ज्या ज्या वर्गसमूहावर किंवा जातीवर विषमतेमुळे अन्याय, अत्याचार झाला असेल तर सरकार विरोधात किंवा व्यवस्था विरोधात विविध प्रकारच्या चळवळी उभ्या राहतात. हा भारताचा इतिहास आहे याचाच एक भाग म्हणून हे सामाजिक व आर्थिक विषमता विरोधात आपल्या न्याय व हक्कासाठी आदिवास्यांनी केलेले बंड म्हणजे नक्षलवाद होय.

**संशोधन उद्दिष्टे :-**

1. नक्षलवादी चळवळ समजून घेणे.
2. नक्षलवादी चळवळीच्या वाढीची कारणे समजावून घेणे.
3. नक्षलवादी चळवळ पूर्णपणे थांबवण्यासाठी उपाय योजना व शिफारशी करणे.

**संशोधन पद्धती :-**

सदर संशोधनासाठी व संशोधन पेपर लिखाणासाठी ऐतिहासिक ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे

**संशोधनाची साधने:-**

सदर संशोधन पेपर लिहिण्यासाठी विविध लेख, संदर्भग्रंथ, विविध समित्यांचे अहवाल, दैनिक वृत्तपत्रे, मासिके इत्यादी दुय्यम साधनाचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला आहे.

**नक्षलवादाचा उदय:-**

पश्चिम बंगालमधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या एका गटाचे असे मत होते की सरकारच्या जमीन सुधारणा कार्यक्रमातून अपेक्षित बदल घडून येत नाहीत आणि शेतकऱ्यांची राजकीय जाणीव व क्रांतीप्रवणता ही कमी होते. त्यामुळे अशा सुधारणावादी उपायांना त्यांचा विरोध होता. त्यांनी सरंजामी व जमीनदारवर्ग आणि शासन व्यवस्था यांच्या विरुद्ध उठाव करण्यास गरीब शेतकरी व आदिवासी तसेच भूमिहीन शेतमजुरांना प्रवृत्त केले.

पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलिगुडी तालुक्यातील पोट विभागात आणि हिमालयाच्या पायथ्याशी नक्षलबारी हा प्रदेश होय. नक्षलबारी हा प्रदेश 207 चौरस किलोमीटरचा असून या नक्षलबारी भागात एकूण 60 खेड्यांचा अंतर्भाव होतो. तेथे संथाळ, ओराऑ, मुंडा आणि राजवंशी ह्या आदिवासी जमाती आहेत. 1967 साली मे महिन्यामध्ये या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नक्षलबारी शाखेने मध्यवर्ती पक्षाला डावलून जमीनदाराविरोधात सशस्त्र उठाव केला होता. त्यामुळे सरंजामदार, जमिनदार व शासनव्यवस्था या विरोधात आदिवास्यांनी 'नक्षलबारी' येथे केलेल्या उठावाला पुढे नक्षलवाद असे म्हटले गेले. 'उठावातील सशस्त्र क्रांतीने सत्तासंपादन' आणि 'माओ त्से तुंग आमचे प्रमुख' ह्या घोषणा प्रामुख्याने होत्या1.

या सशस्त्र उठावाचे नेतृत्व आदिवासी नेते चारू मुजुमदार आणि कानू सन्याल आणि जंगम संथ्याल यांनी केले होते. पश्चिम बंगालमध्ये संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेवर असताना हा उठाव दोन महिने चालला. जुलै 1967 मध्ये सरकारने या तीनही नेत्यांना अटक केले आणि उठाव शांत झाल्यानंतर तीन महिन्यांनी त्याला सोडून दिले.

**नक्षलवाद आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष :-**

'नक्षलबारी' येथे केलेल्या उठावाचे नेते चारू मुजुमदार, कानू सन्याल आणि जंगम संथ्याल हे प्रमुख नेते असून यांच्यावर मार्क्स, लेनिन, आणि चीनमधील क्रांतिचे प्रणेते माओ-त्से-तुंग याचा फार मोठा प्रभाव होता आणि मार्क्स, लेनिन, आणि माओ-त्से-तुंग या विचारप्रणालीचा मूळ गाभा म्हणजे 'शेतकऱ्यांच्या क्रांतीतून सर्वंकष क्रांती घडवून आणणे' होय. मात्र यामुळे क्रांतिकारी नक्षलवादी चळवळीच्या नेत्यांमध्ये आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांमध्ये मतभेद झाले. कम्युनिस्ट पक्षाला सशस्त्र क्रांतीचा लढा मान्य नव्हता, शेवटी कम्युनिस्ट पक्षांमध्ये फूट पडली आणि नक्षलवादी विचाराचा गट कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडला. कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी-लेनीनवादी) असा नवीन पक्ष स्थापन केला.2 त्यामुळे माओने चीनमध्ये शेतकऱ्यांची सशस्त्र क्रांती घडवून चीनची सत्ता हस्तगत केली होती. हा विचार या नक्षलवादी चळवळीने उरी बाळगला होता. त्यामुळेच नक्षलवादाला भारतात 'माओवादी चळवळ' असेही म्हटले जाते.

**नक्षलवादाचा विस्तार :-**

पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या भागातील सशस्त्र क्रांतीपासून देशातील अनेक भागांमध्ये आदिवासी शेतकरी, भूमिहीन व वंचित घटकाने आपल्या न्याय, हक्क व स्वातंत्र्यासाठी जमीनदार,सावकार व शासनाविरोधात बंड उभे केले. नक्षलवाद हा कायद्याविरोधात नसून प्रस्थापित सरंजामशाही, जमीनदार व राज्यसंस्थे विरोधात आहे असे खऱ्या अर्थाने म्हणता येईल. कारण क्रांतीच्या मार्गानेच आपल्याला हक्क व न्याय मिळेल हा विचार आदिवासी मागासजाती, वंचितघटकांच्या मनात खोलवर रुजला गेला. त्यामुळे अशा प्रकारची क्रांती नक्षलबारीप्रमाणे देशाच्या इतर भागांमध्येही सुरू झाली. म्हणजेच 'नक्षलवाद म्हणजे प्रस्थापित सामाजिक-राजकीय जमीनदाराविरोधात केलेलं बंड होय'3 अशी सोपी व्याख्या करता येईल. आजही समाजातील आदिवासी, मागासलेल्या जाती जमाती, अल्पसंख्यांक, गरीब भूमिहीन, बेरोजगार अशा घटकांना नेहमीच अन्याय व अत्याचाराचा सामना करावा लागतो. त्या सर्वांच्या मनात सरंजामशाही, जमीनदार, सावकार आणि शासन या विरोधात प्रचंड चीड दिसून येते. आपल्यावर झालेल्या आणि होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक मागास घटकांमध्ये प्रस्थापित

व्यवस्थेविरोधात मोठ्याप्रमाणावर राग आहे. त्यामुळे हा वर्ग आपल्या अन्याय अत्याचाराविरोधात आवाज उठविण्यासाठी क्रांतीची भाषा करतात, त्यासाठी ते इतर लोकामध्ये जनजागृती करतात. परंतु प्रस्थापित जमीनदार, सावकार, कारखानदार व सरकार त्यांच्या सत्तेचा व सैनिकी सत्तेचा वापर करून त्यांना दाबण्याचा किंवा चळवळ संपवण्याचा विचार करीत असतात. मात्र यांच्या मागण्याकडे किंवा त्यांच्यावर झालेल्या अन्याय व अत्याचाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून जमीनदार व भांडवलदाराचे हित जोपासण्यासाठी शासन न्याय मागणाऱ्यावरच पोलीस कारवाई किंवा लष्करी कारवाई करीत आहे. शिवाय त्यांच्यावरच खोटे खटले दाखल करून त्यांना अटक करीत आहे, याउलट सरकारने त्या आदिवासी मागास, भूमीहीन लोकांच्या प्रामाणिकपणे समस्या सोडवल्या व त्यांच्या विकासाला हातभार लावला तर नक्की नक्षलवादाची समस्या सुटेल. मात्र यासाठी सरकारने लोकशाहीवादी व संविधानात्मक भूमिका स्वीकारणे गरजेचे आहे.

आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम या भागात नक्षलबारी सारखाच तेथील जमीनदार व सरकार विरोधात आपल्या न्याय हक्कासाठी आदिवास्यांनी नोव्हेंबर 1968 मध्ये उठाव केला. 1969 च्या एप्रिल महिन्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, केरळ या राज्यातील आदिवासी नक्षलवाद्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्थापन करून ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी सशस्त्र लढे करून सत्ता काबीज करणे या पक्षाचे मुख्य ध्येय होते. त्यासाठी ग्रामीण व आदिवासी भागात त्यांनी लालतळ स्थापन केले आणि वर्गशत्रूचा नि:पात करणे हे दोन कार्यक्रम त्यांनी हाती घेतले. आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलममधील पार्वतीपुरम् या आदिवासी वस्त्या आणि पश्चिम बंगालमधील डेब्रा व गोपीबल्लवपूर या भागात उठाव करण्यात आला. वर्गशत्रू म्हणजे पोलिस व जमीनदार यांना मारण्यासाठी गनिमी पथके तयार करून पक्षापासून स्वतंत्रपणे कार्य करू लागले. पश्चिम बंगालमधील कलकत्ता शहर व उपनगरांमध्ये आपले जाळे पसरून शाळा, कॉलेज तसेच शासकीय कार्यालयाची नासधूस करणे आणि महापुरुषांच्या पुतळ्यांची विटंबना करण्यास सुरुवात केली. येथील पोलीस, छोटे व्यापारी, राजकीय विरोधक (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते) यांची खून करण्याचे प्रयत्न केले. नंतर युवकांनी व विद्यार्थ्यांनी ही चळवळ चालवण्याचे कार्य केले. नंतर नक्षलवादी चळवळीत पुन्हा फुट पडली. आपआपसामध्ये त्या चळवळीत सशस्त्र संघर्ष झाल्याचा इतिहास आहे. चारू मुजुमदार, कानू सन्याळ आणि जंगम संथ्याल या आदिवासी नेत्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'बंदुकीच्या नळीतूनच क्रांती घडवून आणावी लागेल' असा सशस्त्र क्रांतीचा पक्का विचार त्या तरुणांच्या, शेतकरी, भूमिहीन आदिवासी लोकांच्या मनात रुजविला. चारू मुजुमदार हा प्रमुख क्रांतिकारक असून त्यांनी पेटवलेल्या ठिणगीतून आज वणव्यात रूपांतर झालेले आहे. भारतातील 10 राज्य आणि 82 तालुक्यामध्ये आज ही नक्षलवादी चळवळ विस्तारलेली दिसून येते. अत्यंत घनदाट जंगलामध्ये राहून ते थेट शासन व्यवस्थेला कसे आव्हान देऊ शकतात, गनिमी काव्याने लढण्याचे तंत्र त्यांनी कशा प्रकारे आत्मसात केले. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे राहुल पंडिता या पत्रकार लेखकाने आपल्या 'हॅलो बस्तर द अनटोल्ड स्टोरी स्टोरी ऑफ इंडियाज माओइस्ट मुव्हमेंट' या ग्रंथात दिलेली आहे.4

आंध्र प्रदेशामध्ये शिक्षक असलेल्या कोंडापल्ली सीतारामय्या यांनी तेलंगाना, आदिलाबाद, वारंगळ येथील आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी

उभारलेली चळवळ आणि या चळवळीला चारू मुजुमदारांनी पाठिंबा दिला आणि संपुर्ण आंध्रप्रदेशमध्ये नक्षलवादी चळवळीचा विस्तार करण्यात केला. जंगले, अभयारण्य वाचविण्यासाठी नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता मुपाल्ला लक्ष्मणराव उर्फ गणपती, मालोजुल्ला कोटेश्वरराव यांच्या मुलाखतीतून नक्षलवाद्यांच्या चळवळीविषयी माहिती झालेली आहे. या चळवळीतील बंडखोरांच्या मते, 'नक्षलवादी आदिवासींच्या हक्क व न्यायासाठी आणि ज्या लोकांकडे सरकारने लक्ष दिलं नाही अशा लोकांच्या न्याय, हक्कासाठी आम्ही लढत आहोत, खरं तर आमची आदिवासींच्या मानवी हक्काची चळवळ आहे'.

**भारतातील प्रमुख नक्षलवादी हल्ले :-**

**1) बंगाल मधील उठाव:-**

1960 मध्ये पडलेला दुष्काळ व सरकारची चुकीची धोरणे यामुळे दशलक्ष टन अन्नधान्याची कमतरता पडली होती. बड्या शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील साठविलेले अन्नधान्य गरीब भूमिहीन शेतकऱ्यांना न देता जास्त भावाने बाजारात विकले, राज्यकर्त्यांनी आणि अधिकाऱ्याने या मोठ्या जमीनदार व सावकारांशी हात मिळवणी केली. अन्नधान्याकरिता भरमसाठ व्याजाने कर्ज काढून त्यातून धान्य खरेदी केली. जमीनदार व सावकाराचे कर्ज फेडू न शकल्याने सावकार व जमीनदारांने जमिनी हडप केल्या. 58 टक्के गरीब शेतकऱ्याकडे फक्त 7 टक्के जमिनी होत्या त्यामुळे ते गुलामासारखे ह्या जमीनदाराकडे राबत राहिले. सरकारने जमीन सुधारणा कायदे केले मात्र यातून बड्या शेतकरी आणि जमीनदारांनी पळवाटा काढल्या. त्यामुळे यांचा फायदा गरीब भूमिहीन शेतकऱ्यांना मिळणार नाही परिणामी सर्व शेतकरी अल्पभूधारक व भूमिहीन आदिवासी शेतकरी एकत्र येऊन या बड्या शेतकरी व जमीनदाराविरुद्ध लढा दिला.

**2) संथालचा लढा:-**

1967 मध्ये संथाल आदिवास्यांनी सावकार व जमीनदारांविरोधात आपल्या न्याय हक्कासाठीआणि आपल्या हडप केलेल्या जमिनी परत घेण्यासाठी लढा दिला .

**3) आंध्रप्रदेशातील उठाव:-**

जमीनदार व भांडवलदार हे आपले शत्रू मानून त्यांच्यावर 1969 मध्ये सशस्त्र हल्ला केला. जमीनदार सरंजामदार वर्गाचे निर्मूलन करून गरीब भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप करण्यासाठी नक्षलवादी चळवळीने कार्यक्रम आखला होता. त्यासाठी जमीनदाराच्या घराला आग लावणे, त्यांच्याकडील बंदुका व दारुगोळा हिसकावून घेणे, ग्रामीण भागात आपली केंद्र उभारणे, खेड्यातील सत्ता हस्तगत करणे, तसेच राज्याच्या सत्तेमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी कार्यक्रम आखला होता. त्यानुसार त्यांनी जमीनदार वर्गावर हल्ले करून त्यांच्याकडून जमिनी काबीज करून शेतकऱ्यांना वाटप केल्या, गरीब शेतकऱ्यांचे कर्ज रद्द केले व काही जमीनदारांना ठार मारले तसेच गरीब अल्पभूधारक शेतकऱ्यांवर जुलूम अन्याय करणाऱ्या वर खटले भरण्यासाठी लोकन्यायालय सुरू केली. अशाच प्रकारे मध्यप्रदेश आणि ओरिसा राज्यातही ही चळवळ खूप मोठ्या प्रमाणात विस्तारली.

**4) श्रीकाकुलम येथील जमिनीचे वाटपासाठी लढा :-**

1969 च्या अखेरीस श्रीकाकुलम, वारंगल या क्षेत्रातील जमीन वाटपाची घोषणा नक्षलवाद्यांनी केली.आंध्र प्रदेशातील 15 जिल्ह्यात हा लढा उभा राहिला व जमीनदाराच्या जमिनी ताब्यात घेण्यासाठी त्यांच्यावर हल्ले केले. आणि भूमिहीनांना जमिनीचे वाटप केले[5].

**5) पश्चिम बंगाल मधील मार्क्सवादाचा उठाव 1969 :-**

पश्चिम बंगाल मधील जमीनदाराकडील 'जमीन बळकाव आंदोलन' करून गरीब व भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप करण्यासाठी व सावकाराकडून कर्ज रद्द करण्यासाठी त्यांनी काही सावकार, जमीनदार, पोलीसांच्या हत्याही केल्या.

6) 1980 पासून ते 2013 पर्यंत भारतातील या नक्षलवादी चळवळीने पोलीस व जमीनदारांना आणि सावकारांना लक्ष करून त्यांच्या काही ठिकाणी हत्या केल्या.

7) 2014 मध्ये महाराष्ट्रातील गडचिरोलीमध्ये पोलिसांवर हल्ला केला या हल्ल्यामध्ये सात पोलीस ठार तर दोन जखमी झाले.

8) फेब्रुवारी 2014मध्ये दंतवाडामध्ये पोलिसांवरील हल्ल्यात पाच पोलिसांचा मृत्यू झाला होता.

९) 2015 मध्ये सुकुमा विशेष कृती दलाच्या तुकडीवर जवान आणि पोलिसांच्या चकमकीत सात जणांचा मृत्यू झाला व दहा नागरिक जखमी झाले होते.

10) 2016 मध्ये सीआरपीएफच्या सात जणांचा भूसुरुंग स्फोटात मृत्यू झाला होता.

11) जानेवारी 2010 मध्ये बिहारमधील औरंगाबाद परिसरात सीआरपीएफच्या कोब्रा पथकांचे 10 कमांडोंना चकमकीत ठार केले आणि त्यांच्यासोबत चार नक्षलवाद्याचा मृत्यू झाला होता.

13). फेब्रुवारी 2017 मध्ये झालेल्या छतीसगडमधील सुकमा जिल्ह्यात बारा सीआरपीएफच्या जवानांचा मृत्यू झाला होता.

14) एप्रिल 2017 मध्ये सुकमा जिल्ह्यात 25 सीआरपीएफच्या जवानाचा हल्ल्यात दहा ते बारा नक्षलवादी ठार झाले 6.

**निष्कर्ष:-**

अशाप्रकारे नक्षलवाद्यांनी पोलिसांवर, जमीनदारावर आणि सावकारावर भारतामध्ये अनेक ठिकाणी हल्ले केले. त्याचप्रमाणे पोलिसांनी आणि एसआरपीएफ तुकडीनेसुद्धा वेगवेगळ्या मोहिमा काढून, वेगवेगळे पथक स्थापन करून नक्षलवादयावर देखील हल्ले केले, यात शेकडो पोलीस, एस आर पी जवान सुद्धा ठार झाले आणि त्यासोबत शेकडो नक्षलवादी सुद्धा मरण पावले. नक्षलवाद्यांना बंदुकीच्या गोळीने उत्तर देऊन चालणार नाही तर त्यांच्या मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक व मानवीय दृष्टिकोनातून चर्चा करावी व एक त्रयस्थ एनजीओ आणि सरकारच्या प्रतिनिधींची समिती नेमून यातून मार्ग काढून लोकशाही मार्गाने नक्षलवादाची समस्या कायमस्वरूपी सोडवावी.

**नक्षलवाद ही समस्या सोडवण्यासाठी शिफारसी व उपायोजना :-**

ज्याप्रमाणे समाजात अन्याय अत्याचाराविरोधात सामाजिक न्याय व मानवी हक्कासाठी काही चळवळी उभ्या राहिल्या त्याचप्रमाणे नक्षलवादी ही भूमिहीन व गरीब आदिवासींच्या न्याय हक्कासाठी उभारलेली सशस्त्र क्रांतिकारक चळवळ होय. मात्र माओ विचारावर क्रांतिकारक मार्गाने व सशस्त्र क्रांती वर विश्वास असणारी ही चळवळ आहे. त्यामुळे ही चळवळ जर लोकशाही मार्गात रूपांतरित करायची असेल आणि नक्षलवादाची समस्या कायमस्वरूपी सोडवायची असेल तर सरकारने त्रयस्थ व्यक्ती किंवा एनजीओ आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे शिष्टमंडळ नक्षलवाद्याकडे पाठवून चर्चा करावी आणि त्यांच्या ज्या रास्त, योग्य आणि न्याय्य मागण्या असतील त्या पद्धतशीरपणे लोकशाही व संविधानात्मक मार्गाने सोडवाव्यात. ज्या माध्यमातून ते सशस्त्र क्रांती करणार नाहीत आणि सामाजिक शांतता व सुव्यवस्थेला धोका निर्माण होणार नाही

मात्र त्यासाठी गरज आहे सत्ताधारी पक्ष आणि सरकार यांच्या इच्छाशक्तीची. नक्षलवादाची समस्या सोडवण्यासाठी खालील प्रकारच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**1. मूलभूत सुविधांची सोय करणे:-**

महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री मा.आर आर पाटील असे म्हणतात की, 'मी गडचिरोली या नक्षलवादी असलेल्या जिल्ह्याचा पालकमंत्री असताना मला असे आढळून आले आहे की या नक्षलग्रस्त भागात शिक्षणाची सुविधा नाही, दळणवळणासाठी चांगले रस्ते नाहीत, सर्व सोयीसुविधा असणारे दवाखाने नाहीत, शुद्ध पिण्याचे पाणी नाही, शेतीसाठी जलसिंचनाच्या योजना नाहीत, अनेक गावांमध्ये विद्युत पुरवठा गेलाच नाही आणि त्यामुळे ह्या लोकांच्या मनात सरकार विषयी खूप मोठ्या प्रमाणात चीड निर्माण झाली होती. सरकारने जर भ्रष्टाचार विरहित येथे प्रशासन यंत्रणा राबवून जर सुसज्ज शासकीय शाळा, कॉलेज, वैद्यकीय, इंजिनीरिंग, व्यवस्थापन फार्मसी कॉलेज उभे केले. चांगले दवाखाने उभारले तसेच दळणवळणाच्या सुविधेसाठी चांगले रस्ते तयार केले आणि नक्षलवाद्यांच्या मुलांना मोफत शिक्षण दिले तर नक्षलवादी या सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने चालणारा विचार सोडून लोकशाहीवादी विचार स्वीकारतील. आणि नक्षलवादी विचारापासून परावृत नक्की होतील आणि सरकारविषयी आपुलकीची भावना त्यांच्या मनात निर्माण होईल.कोणत्याही प्रकारचा पोलिसांवर किंवा अन्य कोणावरही हल्ले करणार नाही.

**2. आदिवासी प्रदेशात पुनर वाटप करणे पुनर वाटप करणे :-**

जमीनदार आणि सावकार यांनी खेड्यातील आदिवासींच्या गरिबांच्या जमिनी कर्जाच्या नावाखाली हडप केल्यामुळे भूमीहीन होणाऱ्यासमोर उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळेच जमीनदार आणि सावकार या शोषक वर्गाच्या विरोधात आदिवास्यांनी ही चळवळ उभी केली. त्यामुळे सरकारने धाडसी निर्णय घेऊन जर जमीनदाराकडून आणि सावकाराकडून त्यांच्या जमिनी परत केल्या तर नक्कीच नक्षलवादी हा सस्त्रक्रांतीचा विचार सोडून देतील.

**3. रोजगार निर्मिती करणे :-**

नक्षलग्रस्त भागात विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या जमिनी हिरावून उद्योगपतीला, भांडवलदार व कारखानदारांना न देता शासनाने आदिवासींसाठी उद्योग-व्यवसाय उभे करून तेथील स्थानिक आदिवासी तरुणांना नोकरी व रोजगार उपलब्ध करून द्यावा म्हणजे ते नक्षलवादी विचार सोडून सरकारच्या पाठीशी उभी राहतील. त्यामुळे रोजगार निर्मिती करणे आणि त्यांना उपजीविकेची साधने उपलब्ध करणे महत्त्वाचे आहे.

**4. बुद्धिमान व मानवतावादी अधिकाऱ्यांची नेमणूक करणे :-**

नक्षलग्रस्त भागात जर लोकशाहीवादी, बुद्धिमान, मानवतावादी आणि समाजशील विचाराच्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली तर ते आदिवासी लोकांशी बदला घेण्याच्या नजरेने पाहणार नाहीत, त्यांच्याशी सामोपचाराने आणि लोकशाही मार्गाने चर्चा करतील आणि जनता नक्षलवादी आणि शासन यांच्यात समन्वयक म्हणून काम करतील. त्यामुळेच नक्षलवाद्यांना शासकीय अधिकाऱ्यांविषयी तिरस्कार न राहता आपुलकी निर्माण होईल.आणि ते नक्षलवादी विचारापासून परावृत नक्की होतील.

**5. राजकीय व प्रशासकीय सत्तेत त्यांना सहभागी करणे :-**

नक्षलग्रस्त भागात आदिवासी तरुणाची पोलीस दलात व इतर प्रशासनात जाणीवपूर्वक

नेमणूक करावी आणि तेथील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी. त्यांना पुरेसे अधिकार प्रदान करून आदिवासींच्या समस्या सोडवण्यासाठी अतिरिक्त निधी द्यावा म्हणजे नक्षलवादाच्या समस्या सुटतील[7].

**6. सावकारीला पूर्णपणे बंदी :-**

नक्षलग्रस्त भागात कोणत्या प्रकारच्या सावकारीला आणि व्याजाच्या आर्थिक व्यवहाराला परवानगी देऊ नये तसेच आर्थिक शोषणाला व सावकारीच्या व्यवसायाला पूर्णपणे कायद्याने बंदी घालावी आणि जे सावकारी करतील व व्याजाने पैसे देतील त्यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना कारावास व त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यासाठी कठोर कायदा करावा म्हणजे आदिवासी नक्षलवाद सोडून लोकशाही शासनावर पूर्णपणे विश्वास ठेवतील.

**7. राज्यघटना आणि लोकशाहीचा प्रचार आणि प्रसार कार्यक्रमावर भर द्यावा:-**

नक्षलग्रस्त भागात राज्यघटना तसेच लोकशाहीचा प्रचार-प्रसारासाठी आदिवासींना व नक्षलवाद्यांना प्रोत्साहन द्यावे. यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखून सर्वांना भरघोस भत्याची तरतूद करावी हा कार्यक्रम महिन्यातून चार दिवस असावा आणि प्रत्येक दिवसाला किमान एक हजार रुपये भत्ता आदिवासी व नक्षलवादी लोकांना प्रशिक्षणासाठी द्यावा. ज्यामाध्यमातून त्यांना भारताची राज्यघटना समजेल आणि लोकशाही आपली वाटेल.

**8. सर्व प्रकारचे मोफत व सक्तीचे शिक्षण:-**

नक्षलग्रस्त भागात प्राथमिक शिक्षण( मराठी व इंग्रजी माध्यम), माध्यमिक शिक्षण, पदवी शिक्षण, पदव्युत्तर शिक्षण, आयटीआय, मेडिकल, इंजिनिअरिंग, फार्मसी, चित्रकला, शिक्षण देणारे कॉलेज प्रत्येक तालुक्यात व शहराच्या ठिकाणी सरकारने शासकीय खर्चाने शासकीय महाविद्यालय म्हणून चालू करावेत यामध्ये आदिवासी मुलांसाठी 70 टक्के मोफत प्रवेश कोठा ठेवावा. जेणेकरून त्यांच्या सर्व मुलांना शिक्षण मिळेल आणि ते भविष्यात उद्योग व्यवसाय व नोकरी करतील. नक्षलवाद ही प्रवृत्ती त्यांच्यामध्ये येणार नाही यासाठी सरकारने कालबद्ध नियोजन करावे, हे सर्व शासकीय शाळा व महाविद्यालय सुरू केले तर नक्कीच भारतातील नक्षलवादाची समस्या पूर्णपणे सुटेल यात कोणतीही शंका नाही.

**9. मुख्यमंत्री व संचित निधीतून नक्षलग्रस्त विकासासाठी निधीची भरीव तरतूद :-**

दरवर्षी नक्षलवाद संपवण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च केला जातो. मात्र तोच निधी तसेच मुख्यमंत्री व संचित निधीतून किमान 15 टक्के निधी जरी या नक्षलग्रस्त आदिवासी भागातील मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी खर्च केला तर नक्कीच आदिवासी इतर समाजाच्या बरोबर विकासाच्या प्रवाहात सामील होतील. त्यांना उपजीविकेची साधने उपलब्ध होऊन आर्थिक विकास करता येईल आणि आपोआपच सरकार विरोधी सूडाची भावना निर्माण होणार नाही. या तरुणाचा सरकारकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल सरकार आपले आहे, सरकारने आपल्यासाठी प्रामाणिकपणे वेगवेगळ्या विकासाच्या योजना राबविल्या, आपल्यासाठी सरकारी शाळा, सरकारी कॉलेज उभी केली, आपल्या परिसरात रोजगार उपलब्ध करण्यासाठी शासकीय खर्चाने उद्योग व्यवसाय उभे केले, आपल्या सर्व तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला, उपजीविकेची साधने उपलब्ध करून दिले, यासाठी सरकारने मोठ्याप्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. यामुळे सरकार आमच्या हितासाठी काम करते, सरकार आमच्या कल्याणासाठी काम करते. त्यामुळे

सरकारविषयी आपुलकी निर्माण होऊन नक्षलवाद कायमस्वरूपी नष्ट होईल यात कोणतीही शंका नाही.

**सारांश समारोप.**

अशाप्रकारे नक्षलवाद हा सरकारविरोधी आहे, नक्षलवादी चळवळ ही कायदा मोडणारी चळवळ आहे असे नसून ती भूमिहीन आदिवासींच्या न्याय हक्कासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांच्या विरोधात उभी केलेली चळवळ असून सामाजिक व आर्थिक विषमता विरोधी समतावादी व न्यायवादी चळवळ आहे. मुळात जमीनदार आणि उद्योगपती व सावकार यांनी त्यांच्या जमिनी हिरावून घेतल्यामुळे सरकारने जमीन सुधारणा कायदा करून सुद्धा प्रशासनाच्या भ्रष्टप्रवृत्तीने मार्ग काढून जमीनदाराच्या मागे प्रशासन उभे राहिले आहे. प्रशासनाने या जमीन सुधारणा कायदा व कमाल जमीन धारण कायदा या कायद्यातून पळवाटा काढल्यामुळे आदिवासींच्या जमिनी जमीनदारांनी सावकाराने बळकावल्या. त्यामुळे जमीनदार व सावकारांच्या विरोधात ही चळवळ उभी राहिली आहे त्यासाठी सरकारने लोकशाही मार्गाने त्यांच्या मागण्यांचा विचार करून ज्या रास्त व न्याय्य मागण्या आहेत त्या त्रयस्थ सामाजिक कार्यकर्त्यांकडून किंवा एनजीओकडून नक्षलवाद्यांशी चर्चा करून सोडवाव्यात. नक्षलवाद्यांच्या मागण्या मान्य करून सोडवल्या किंवा वर सुचवलेल्या उपाययोजना शासनाने जर केल्या नक्कीच नक्षलवादाची समस्या सुटू शकेल यात कोणतीही शंका घेण्याचे कारण नाही यासाठी मात्र सरकारने त्या परिसरात रोजगार निर्मिती करावी, सरकारने सावकारांनी घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांना भूमिहीन शेतकऱ्यांना परत कराव्यात, कमाल जमीन धारणा कायदा कडक करावा, त्या परिसरामध्ये शासकीय शाळा महाविद्यालय स्थापन करावी, सर्व प्रकारचे शिक्षण मोफत द्यावे, रस्ते दळणवळण, विद्युत पुरवठा, आरोग्याच्या अत्याधुनिक सोयी सुविधा आणि इतर सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सोयीसुविधा त्या ठिकाणी मोफत उपलब्ध करून द्याव्यात म्हणजे इतर समाजाबरोबर त्यांचा सामाजिक आणि आर्थिक विकास केला तर अनेक वर्षापासूनची नक्षलवादाची समस्या सुटेल.

**संदर्भ**


1 'नक्षलवादी', मराठी विश्वकोश.
2. प्रा.डोळस अविनाश, डॉ. लिंबाळे शरणकुमार, 'सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी' प्रकाशक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
3. डॉ. भोसले हर्षद, 'शहरी नक्षलवाद शब्द आला कुठून' आपलं महानगर, मुंबई. दिनांक 30 ऑगस्ट. 2018.
4. उपासणी विनय, 'भारतातील माओवादी चळवळीवर प्रकाश' महाराष्ट्र टाइम्स, मुंबई. 6 ऑगस्ट. 2011
5. डॉ. शिरगावे दादासाहेब, प्रा. शिंदे वसंत, 'स्थानिक स्वराज्य संस्था आणि महाराष्ट्रातील चळवळी' निराली प्रकाशन, पुणे.
6. बीबीसी न्यूज मराठी, 'गडचिरोली हल्ला नक्षलवाद म्हणजे काय' दिनांक 1 मे 2019.
7. प्रा.खंदारे दिनेश, 'नक्षलवाद कारणे व उपाय' अर्हत रिसर्च जर्नल.